**महाराष्ट्र शासन**
**उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया**
११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया
ईमेलdmmugondia@gmail.com फोन नं ०७१८२ - २३६६२०

**जा.क्र. म.रा.ग्रा.जी.अ./गो/ ३१९ /२०१७** **दिनांक २८/०७/२०१७**

## वाहने भाडे तत्वावर घेण्याबाबत

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहायाने दिनदयाळ अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी गोदिया जिल्हयात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाकरिता १ वाहन मासीक आधारावर व वेळोवेळी आवश्यकतेनुसार लागणारे इतर वाहने भाडे तत्वावर घेण्यास्तव एक वर्ष कालावधीसाठी Frame work agreement करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन मर्यादित ई-निविदा (Limited e-tender) प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादाराकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate),
२. http://mahatenders.gov.inया संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा. (पत्रात login Id नमुद करावे किंवा संकेत स्थळाचा login Id असलेला स्क्रिन शॉट सादर करावे )
३. PAN कार्ड असावे.
४. GST अंतर्गत नोंदणी असावी.
५. स्वत: च्या मालकीचा TATA SUMO/ SCORPIO/ TAVERA/ BOLERO/ INOVA/ ZYLO किंवा इतर समकक्ष कमित कमी १ वातानुकुलीत वाहन, कमित कमी ७ + १ आसन क्षमता असलेला व १ जुलै २०१३ किंवा त्यानंतर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (वाहनाचा नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे)

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या पुरवठादाराकडुन वाहन भाडे तत्वावर पुरविण्याकरिता १ वर्ष कालावधीकरिता करार करण्यासाठी त्यांनी त्यांच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणीकृत केलेला Login Id तसेच क्र. २ व ५ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया या पत्यावर दिनांक ०५ /०८/२०१७ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा.सदर अर्ज procurementgondia@gmail.com या ईमेल वर सुध्दा सादर करता येवू शकेल. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादार यांच्याकडून कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही

**जिल्हा अभियान संचालक**
**उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,**
**गोंदिया**